दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...
पुणे/पिंपरी-चिंचवड
आरएनआय : MAHMAR/2021/85884 मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर, २०२५ वर्ष - १ अंक - ५५ पाने - ४



# शेख हसीना यांना फाशीची शिक्षा!

## मृत्युदंडाची शिक्षा झाल्यानंतर त्यांचे समर्थक आक्रमक झाले

**मुंबई :** माजी पंतप्रधान शेख हसीना यांना एका आंदोलन प्रकरणात दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरण कोर्टाने ही फाशीची शिक्षा सुनावली. सन २०२४ साली बांगलादेशमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनप्रकरणी त्यांच्यावर खटला सुरू होता, त्यात आज न्यायालायने) महत्पूर्ण निकाल दिला. २०२४ च्या या आंदोलनानंतर शेख हसीना यांना देश सोडावा लागला होता. या हिंसक आंदोलनामध्ये हत्या आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचे आरोप माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर ठेवण्यात आले होते. मात्र, शेख हसीना यांच्याकडून हे आरोप स्पष्टपणे फेटाळून लावण्यात आले आहेत. दरम्यान, या हिंसाचाराच्या घटनेनंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर बांगलादेशात मोहम्मद युनूस यांचं सरकार स्थापन झालं होतं. बांगलादेशमध्ये सरकारविरुद्ध उफाळलेल्या जनक्षोभावेळी करण्यात आलेल्या गोळीबाराच्या घटनेवरुन शेख हसीना यांच्यावर मानवतेविरुद्धचा खटला दाखल करण्यात आला होता. सन 2024 च्या जुलै महिन्यात सरकारविरोधात मोठं आंदोलन उभारण्यात आलं होतं, दोन महिने चाललेल्या या आंदोलनादरम्यान १४०० नागरिकांची हत्या झाली, तर जवळपास २५ हजार जखमी झाले होते, अशी माहिती मुख्य अभियोक्ता ताजुल इस्लाम यांनी न्यायालयात सुनावणीवेळी दिली. या खटल्यात त्यांना दोषी ठरवत बांगलादेशमधील ICT न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. शेख हसीन सध्या भारतात राहत असून त्यांच्या अनुपस्थितीतच त्यांच्याविरुद्ध हा खटला चालवण्यात आला. ४५३ पानांच्या या निर्णयाचे वाचन करण्यापूर्वी न्यायमूर्ती मोहम्मद गुलाम मुर्तजा मजूमदार यांनी हा निर्णय ६ भागांमध्ये सुनावणी केला जाईल असे सांगितले होते. बांगलादेशमधील टेलिव्हीजनवर या निकालाच्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. शेख हसीना यांना बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने शेख हसीना यांचं प्रत्यार्पण करण्याची विनंती केली आहे. याबाबतच्या निवेदनात बांगलादेशाने म्हटलं की माजी पंतप्रधान शेख हसीना या बांगलादेशात परतण्यासाठी सुनिश्चित करणं ही नवी दिल्लीची जबाबदारी आहे.हसीना शेख यांनी त्यांना झालेल्या शिक्षेवर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की, “न्यायालयात माझा बचाव करण्याची कोणतीही न्याय संधी देण्यात आली नाही.” तसेच हसीना यांनी न्यायाधीशांवर “पक्षपाती आणि राजकीय हेतूने प्रेरित” निर्णय दिल्याचा आरोप केला. हसीना यांनी असाही आरोप केला की, ट्रिब्यूनल हे छेडछाड केलेले आणि कोणताही लोकशाही जनादेश नसलेल्या तसेच निवडून न आलेल्या सरकारद्वारे स्थापन आणि अध्यक्षता भूषवलेले होते. “योग्य ट्रिब्युनल जेथे पुराव्यांना महत्व असेल आणि त्यांची न्याय पद्धतीने तपासणी केली जाईल, तर त्यामध्ये मी माझ्यावर आरोप करणांना सामोरे जाण्यास घाबरत नाही.”शेख हसीना यांनी परिस्थिती हाताळण्याची आणि हिंसा रोखण्याची जबाबदारी सक्षमपणे पार पाडली नाही. न्यायालयात सादर पुराव्यांवरुन असेही दिसून येते की, पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) देखील या प्रकरणात दोषी असू शकतात. न्यायालयाने म्हटले की, १९ जुलैनंतर गृहमंत्र्यांच्या निवासस्थानी सतत बैठका झाल्या, ज्यात विद्यार्थी आंदोलनाला दडपण्याचे निर्देश देण्यात आले. आंदोलकांना लक्ष्य करण्याचे आदेश तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांनी एका कोअर कमिटीला दिले होते, तर अवामी लीगचे समर्थक सक्रियपणे आंदोलकांना त्रास देत राहिले. आयजीपीच्या चौकशीत त्यांनी कथित कृत्यांमध्ये आपला सहभाग स्वीकारला, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

### भारताने काय म्हटलं?

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं की, “माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याबाबत बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने जाहीर केलेल्या निकालाची भारताने दखल घेतली आहे. जवळचा शेजारी देश म्हणून भारत बांगलादेशातील लोकांच्या सर्वोत्तम हितासाठी वचनबद्ध आहे. यामध्ये त्या देशातील शांतता, लोकशाही, समावेशकता आणि स्थिरता यांचा समावेश आहे. आम्ही या उद्देशाने नेहमीच सर्व भागधारकांशी रचनात्मकपणे संवाद साधू.”

### तुळजाभवानी मंदिराचा गाभारा मूळ स्वरूपातच

तुळजापूर : येथील तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा व मंदिराच्या स्वनिधीतून होणाऱ्या मंदिर दुरुस्तीच्या कामात मंदिराचा मूळ गाभारा पाडला जाऊ नये, अशी मागणी भोपे पुजारी मंडळाच्या वतीने केली जात होती. दरम्यान, मंदिराचा गाभारा पूर्णपणे न पाडता तो मूळ स्वरूपातच ठेवण्याचा निर्णय मुंबईत पुरातत्त्व विभागासोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम यांनी दिली. तसेच पुरातत्त्व विभागाने देवीचे गर्भगृह पूर्णतः न पाडता केवळ अंतराळ आणि शिखराची दुरुस्ती केली जाईल.

## मनपा निवडणुका मार्चनंतरच?

### नगर परिषदा, जिल्हा परिषद निवडणुकाच घेणे शक्य

**मुंबई :** येत्या ३१ जानेवारी २०२६ खेर महानगरपालिकांसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असले तरी राज्यातील २८ महानगरपालिकांच्या निवडणुका मात्र मार्च २०२६ नंतरच होण्याची शक्यता आहे.

राज्यातील ग्रामपंचायती वगळता मागील दोन-अडीच वर्षे नगर परिषद नगरपंचायती जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महानगरपालिकांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. ओबीसी आरक्षण, प्रभाग आणि वॉर्ड रचनेच्या विरोधात सरकार आणि राजकीय याचिकाकर्ते न्यायालयात गेल्याने या निवडणुका रखडल्या. यातून



स्थानिक स्वराज्य धोक्यात आले व सर्वसामान्यांची कामे रखडत असल्याचे पाहून अखेर सर्वोच्च न्यायालयानेच राज्य निवडणूक आयोगाला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ अखेरपर्यंत पूर्ण

करण्याचे आदेश दिले आहेत. इतकेच नाही तर ही मुदत आणखी वाढवून देण्यासही न्यायालयाने नकार दिला होता. महापालिकांसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीची डेडलाईन दिली आहे. त्यानुसार नगर परिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका डिसेंबरमध्ये तर जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका जानेवारीमध्ये पूर्ण होऊ शकतील. सुप्रीम कोर्टाच्या डेडलाईनमध्ये महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम मात्र बसणे कठीण दिसते. त्यामुळेच महापालिकांच्या निवडणुकांची डेडलाईन ३१ जानेवारीच्या पुढे वाढवून देण्याची विनंती राज्य निवडणूक आयोगाकडून न्यायालयाला केली जाऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

### लाल किल्ला मेट्रो स्टेशनचे आता सर्व दरवाजे खुले

नवी दिल्ली: लाल किल्ल्याजवळील स्फोटानंतर सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आलेले लाल किल्ला मेट्रो स्टेशन आता पूर्णपणे उघडण्यात आले आहे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (डीएमआरसी) रविवारी ही घोषणा केली. त्यामुळे पुन्हा एकदा या ठिकाणाहून प्रवाशांची वर्दळ दिसू लागली आहे. परिस्थिती सामान्य होत आहे. सध्या लाल किल्ला परिसरातील बॅरिकेड्सही हटवण्यात आले आहेत. १० नोव्हेंबरला लाल किल्ला परिसरात मेट्रो स्टेशनजवळ मोठा स्फोट झाला. त्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव लाल किल्ला मेट्रो स्टेशनचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते. रविवारी ते उघडण्यात आले. यापूर्वी शनिवारी दोन दरवाजे उघडण्यात आले होते.

## काँग्रेसने आत्मपरीक्षण करणे गरजेचे

### बिहार निवडणुकीवर पृथ्वीराज चव्हाण यांचे स्पष्ट मत

**मुंबई :** बिहार निवडणुकीच्या निकालांवर देशभरात चर्चा सुरू असताना, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसच्या अंतर्गत गोंधळ, चुकीचे अंदाज आणि अपयशी रणनीतीवर थेट बोट ठेवले आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना चव्हाण यांनी पक्षाला आरसा दाखवणारे वक्तव्य केले असून, त्यांनी काँग्रेसच्या सल्लागारांच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मी बिहारला गेलो नाही, पण संपूर्ण राज्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. तसेच काँग्रेसच्या सल्लागारांनी दिलेले अंदाज वास्तवापासून दूर होते. आपल्याकडे १९ जागा होत्या, त्या २१ किंवा २२ झाल्या असत्या, अगदी



१७-१८ झाले असते तरी ठीक, पण निवडक ३० जागा लढल्या असत्या आणि राजदला ४० जागा देण्याची भूमिका घ्यायला हवी होती. तसेच जागावाटपात उदारमतवादी भूमिका घेतली असती तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या, असेही चव्हाण यांनी म्हटले.

चढ उतार असतात. याचे मूल्यांकन करताना, मला कदाचित एकच गोष्ट वाटेल, दूरवरून, काँग्रेस पक्षाचे सल्लागार जे मतांचे आरक्षण करत होते, त्यांनी कदाचित योग्य आकडे दिले नसतील. आपण निवडक ३० जागा घेत उर्वरित ४० जागा राजदला दिल्या असत्या तर एक चांगला संदेश गेला असता आणि कदाचित जागांची संख्या काहींनी वाढली असती. आपण स्वतःचे परीक्षण केले पाहिजे, काँग्रेस काय करत आहे याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे.

विचारांची लढाई एक-दोन दिवसात संपत नाही पुढे बोलताना पृथ्वीराज म्हणाले, मी काँग्रेस पक्षाबद्दल काहीतरी सांगू शकतो, तेही, जे मी थोडे पाहिले आहे. आपण काँग्रेस पक्षाचे आत्मपरीक्षण करत आहोत. जेव्हा जेव्हा विचारांची लढाई असते तेव्हा ती एक-दोन दिवसात संपत नाही.



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यासाठी आज मुंबईत स्मारक स्थळी जमलेली गर्दी

### अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल ; आई शर्मिला ठाकरे म्हणाल्या मला अभिमान आहे

**चेन्नई :** नेरुळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विनापरवाना उद्घाटन केल्याप्रकरणी मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्यावर नवी मुंबईत गुन्हा दाखल झाला आहे. रविवारी राजीव गांधी पुलावर असलेल्या महाराजांच्या पुतळ्याचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. गेल्या चार महिन्यांपासून हा पुतळा उद्घाटनाविना पडून असल्याचा आरोप मनसेने केला होता.

या कारवाईनंतर अमित ठाकरे यांच्या मातोश्री शर्मिला ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया देताना स्पष्टपणे सांगितले की, “मला अभिमान आहे, खूप अभिमान आहे. मी तर वाट बघते की माझ्यावर कधी केस होते!” त्यांच्या या रोखठोक वक्तव्याची मोठी चर्चा सुरु आहे.

त्या पुढे म्हणाल्या, “यांना निवडणुकीसाठी फक्त महाराज दिसतात. सरकार किल्ल्यांवर ‘नमो सेंटर’ उभारणार असल्याचे बोलले जात आहे. किल्ले हायजॅक करण्याचा प्रयत्न आम्ही होऊ देणार नाही. पुतळा धुळीने भरलेला होता, पंतप्रधान आले तेव्हाही हे कुणाच्या लक्षात आले नाही,” अशी टीकाही त्यांनी केली. शर्मिला ठाकरे यांनी वांद्रे किल्ल्यावर झालेल्या दारू पार्टीचा मुद्दाही उपस्थित केला. “तिथे कोण परवानगी देतं? किल्ल्यांवर झोपड्या उभ्या राहतात, तिथे पोलीस दिसत नाहीत. मग इथेच तत्परता का?” असा सवाल त्यांनी पोलिस प्रशासनाला केला. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र लढण्याच्या चर्चेवर त्या म्हणाल्या, “निवडणुकीसाठी दोन भाऊ एकत्र आले तर चांगलेच.”

अमित ठाकरे यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, मनसेनेही या कारवाईविरोधात आवाज उठवण्याचे संकेत दिले आहेत.

### अल्पवयीन मुलीवर बलात्कारप्रकरणी ओतूर पोलिसात गुन्हा दाखल

**ओतूर :** येथील पोलिस ठाण्यात सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवीदास रोहीदास गर्जे सध्या रा.नेतवड ता. जुन्नर जिल्हा पुणे, मुळ रा बडेवाडी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर ह्या आरोपीचे नाव असून त्याला ओतूर पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर देवीदास गर्जे यांनी रविवारी सायंकाळी बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली. ओतूर पोलिसांनी त्वरित तक्रार दाखल करून आरोपीला अटक केले. तसेच पिडित अल्पवयीन मुलीला पुणे येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी कामी दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक लहु थाटे हे करीत आहेत.

## विशेष संपादकीय

### लोकशाहीचं अवमूल्यन

**बिहारची** निवडणूक जाहीर होताच राजकारणात खळबळ माजणार हे माहीत होतं; पण एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीचा स्फोट निवडणुकीच्या तोंडावर होईल, याची कल्पना कुणालाच नव्हती. आचारसंहिता लागू होण्याच्या अवघ्या एका तास आधी तब्बल १४ हजार कोटी रुपये काढले गेले आणि १.२५ कोटी महिला मतदारांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये जमा झाले. या गंभीर आरोपाने बिहारच्या राजकारणाला अक्षरशः हादरवून टाकलं आहे. हे आरोप सामान्य राजकीय टोमणे नव्हेत; तर शासन-प्रशासन यंत्रणेत उच्च पातळीवर काम केलेल्या जनसुराज पक्षाचे प्रवक्ते पवन वर्मा यांनी केले आहेत. त्यामुळे हे आरोप फेटाळण्यापेक्षा ते तपासले जाणे हीच लोकशाहीची किमान अपेक्षा ठरते. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला शून्य जागा मिळाल्यानंतर वर्मा यांनी ही माहिती मांडली. पण ही माहिती पराभवाचा राग नाही; तर शासनाच्या आर्थिक नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उभं करणारा आरोप आहे. राज्याचा खजिना रिकामा असल्याचं सरकारनंच काही महिन्यांपूर्वी सांगितलं होतं. बिहार राज्याचं कर्ज चक्क ४,०६,००० कोटी पर्यंत पोहोचलं असून रोजचं व्याज ६३ कोटी रुपये आहे, असा वर्मा यांनी दिलेला आकडा भीतीदायक आहे. ज्याचे व्याजच दररोज अब्जो रुपये खातं, ते राज्य निवडणुकीच्या तोंडावर १४ हजार कोटी रुपये कसे काय खर्च करू शकतं? हा प्रश्न टाळता येणार नाही. पण या कथेतला सर्वात धक्कादायक भाग म्हणजे निधीचा स्रोत. वर्मा यांनी दावा केला आहे की जागतिक बँकेकडून दुसऱ्या प्रकल्पासाठी घेतलेला पैसा महिलांना वाटण्यात आला. हे खरं ठरलं, तर हा केवळ निवडणूक गैरप्रकार नाही, तर राष्ट्राची आर्थिक प्रतिमा डागाळणारा गुन्हा आहे. जागतिक आर्थिक संस्थांकडून घेतलेला पैसा निवडणुकीत “बेनिफिट ट्रान्सफर” म्हणून वापरणं म्हणजे आंतरराष्ट्रीय करारांचं, नियमनांचं आणि देशाच्या विश्वासार्हतेचं सरळ उल्लंघन. कोणत्याही राज्याने असं पाऊल उचलणं म्हणजे आर्थिक अराजकतेचं दार उघडणं आहे. महिला रोजगार योजनेअंतर्गत रक्कम जमा झाली, एवढंच सरकार सांगतं. पण कोणत्या निकषांवर? कोणत्या तरतुदीनुसार? आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आचारसंहिता लागू होण्याच्या नेमक्या तासाभर आधीच का? या प्रश्नांची उत्तरं देणं टाळणं म्हणजे संशय अधिकच पक्का करणं. लोकशाहीत सरकारची शांतता ही कधीही सद्भावनेची नसते; ती बहुतेकदा सत्य दडवण्याची चिन्हे असतात. या प्रकरणात दुसरा मुद्दा अधिक व्यापक आहे. प्रशांत किशोर यांना पर्यायाची भाषा बोलताना बिहारने संधी दिली नाही. विचाराची भाषा नाकारली आणि सरकारी लाभांची भाषा स्वीकारली—ही निवडणुकीची धक्कादायक दिशा आहे. मतदारांना थेट पैशांद्वारे प्रभावित करणारी प्रथा जर पाय रोवेल, तर उद्याच्या भारतात निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव नव्हे, तर “लाभ-वितरणाचा बाजार” ठरेल. विचार, धोरणे, विकास मॉडेल, शासनकौशल्य—हे सारे मागे पडेल आणि फक्त पैशांच्या आधारावर निर्णय होऊ लागतील. लोकशाहीचा पाया म्हणजे स्वातंत्र्य; पण पैशाच्या ओझ्याखाली स्वातंत्र्य कधीच टिकत नाही. बिहारचा हा नमुना धोकादायक आहे. आज निधी महिलांना; उद्या कोणत्या समाजघटकाला? आज १४ हजार कोटी; उद्या २० की ३०? जर निवडणुका सरकारी खजिन्याच्या तिजोरीवर अवलंबून राहिल्या, तर सत्तांतर म्हणजे विचारांचं नाही, तर आर्थिक सामर्थ्याचं युद्ध उरेल. आणि ही अवस्था आली, तर लोकशाही केवळ नावापुरती राहील. खरं सत्ता-व्यवहार काही मोजक्या हातात केंद्रित राहील. या संपूर्ण प्रकरणाचं मूळ म्हणजे जबाबदारीचा प्रश्न कोणाच्या आदेश दिला? पैसा कुठून आला? कोणत्या प्रकल्पाचा निधी वळवला? आचारसंहितेची पायमल्ली का झाली? जागतिक बँकेची मंजुरी किंवा माहिती होती का? ही सर्व उत्तरं शोधण्यासाठी केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप पुरेसे नाहीत. स्वतंत्र, उच्चस्तरीय, न्यायालयीन चौकशी अत्यावश्यक आहे.

**-डॉ. अशोक बालगुडे,** संपादक – दै. राज्य लोकतंत्र, पुणे

### अल-फलाह विद्यापीठातून १५ डॉक्टर बेपत्ता

**नवी दिल्ली :** लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या आत्मघाती स्फोटामागे अल-फलाह विद्यापीठातील फरिदाबाद (हरियाणा) कॅम्पसच्या आतून चालवल्या जात असलेल्या एका कट्टरपंथी व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूलशी संबंध असल्याचे रविवारी स्पष्ट झाले. तपासात या विद्यापीठातील सुमारे १५ डॉक्टर बेपत्ता असल्याची खळबळजनक माहिती हाती येत असून त्यामुळे तपास यंत्रणांचे छापेसत्र सुरू झाले आहे. त्यात पठाणकोटमधून एका डॉक्टरला ताब्यात घेण्यात आले; तर अनंतनाग येथील एका वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीला ताब्यात घेऊन चौकशी करून सोडण्यात आले.

# वंचित - काँग्रेसचे सूत जुळण्यास प्रारंभ

## नांदेड, बुलडाणानंतर अनेक जिल्ह्यात हालचाली

**अकोला : युती सन्मानाने व्हावी यासाठी पन्नास टक्के जागांचा आग्रह धरून वंचित बहुजन आघाडीने काँग्रेस सोबत नांदेड आणि बुलडाणा जिल्ह्यात युती केल्याने अनेक जिल्ह्यात कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्यामुळे राज्यभरात वंचित - काँग्रेसच्या नव्या मैत्रीचे पर्वा सुरु होणार असल्याचे चित्र आहे.**



काँग्रेसशी जुळवून घेण्याची सुरुवात मराठवाड्यात नांदेड जिल्ह्याने सर्वप्रथम करून इतर जिल्ह्याना प्रेरणा दिल्यानंतर बुलडाणा जिल्ह्यात दोन्ही पक्षाची स्थानिक स्वराज्य संस्था साठी सामान वाट या तत्वावर युती झाली आहे. दोन्ही जिल्ह्यात उभय पक्षांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आगामी वाटचालीची घोषणा केली आहे. वंचित आघाडीचे संस्थापक ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्थानिक निवडणुकीसाठी जिल्हा युनिटकडे अधिकार दिल्यावर स्थानिक मैत्रीच्या बोलणीला सुरुवात झाली. या दोन जिल्ह्यानंतर आणखी आठदहा जिल्ह्यात तश्या प्रकारच्या हालचाली सुरु असून स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षाकडून बोलणी सुरु असल्याची माहिती असून पालिकांसाठी उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी इतर जिल्ह्यांचे चित्र स्पष्ट होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सभोताली अशी मैत्री होत असताना अकोल्यात का नाही असाही सवाल दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते करीत असताना अकोल्यात सुद्धा त्यासाठी काँग्रेस आणि वंचित आघाडी कडून पुढाकार घेतला जात असल्याची माहिती आहे.

### सुजात यांचा मोकळा हात

काँग्रेस सोबत पालिकांसाठी युती करताना पन्नास टक्के जागांच्या अटीत कोणतीही तडजोड पक्ष करणार नसल्याची भूमिका वंचितचे युवानेते सुजात आंबेडकर यांची असल्याची माहिती असून स्थानिक युनिटला त्यांनी याबाबत बऱ्यापैकी मोकळीक दिल्याने विदर्भात यावेळी वंचित - काँग्रेस युतीला अपेक्षित यश मिळेल असेही बोलले जात आहे.

## सारांश वृत्त

**राजगडावर पर्यटक महिला जखमी**

**राजगड (वेल्हे) :** सुट्टीच्या दिवशी पर्यटकांनी गजबजलेल्या राजगडावर रविवारी एक महिला पर्यटक दगड लागून जखमी झाली. प्राथमिक उपचारानंतर तिला पुढील उपचारासाठी पायथ्याशी हलविण्यात आले. मुंबई येथून पर्यटनासाठी आलेल्या वीस महिलांच्या गटातील वर्षा हुंडारी (वय अंदाजे ३१) या बालेकिल्ला परिसरात वर जात असताना ही घटना घडली. किल्ल्यावरील माकडाच्या हालचालीदरम्यान दगडाला धक्का बसला आणि तो थेट त्यांच्या डोक्यावर येऊन पडला. दगडाचा मार बसताच सहकाऱ्यांमध्ये घबराट पसरली. घटनास्थळी किल्ल्याचे पहारेकरी विशाल पिलावरे, बापू साबळे व दादू वेगरे यांनी तात्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. इतर पर्यटकांच्या मदतीने त्यांनी जखमी महिलेला सुरक्षितरीत्या खाली आणले.

**तपासणीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून 45 हजारांचे दागिने लंपास**

**पुणे :** मंगळवार पेठेतील एका खासगी रोगनिदान केंद्रात तपासणीसाठी आलेल्या कोथरूडमधील महिलेच्या पिशवीतून तब्बल ४५ हजार रुपयांचे दागिने आणि रोकड लांबविण्यात आली. तपासणीदरम्यान निष्काळजीपणे ठेवलेली पिशवी चोरट्याने चोरल्याचे समजताच महिलेने फरासखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचा तपास पोलीस हवालदार मनीषा पुकाळे करत आहेत.
कोथरूडमध्ये मंदिरातील दानपेटी फोडली; दोन लाखांची रोकड फरार उजवी भुसारी कॉलनीतील संकल्प सिद्धी हनुमान मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल दोन लाखांची रोकड चोरून नेली. रविवारी मध्यरात्री ही घटना घडली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.


**धावत्या पीएमपी बसमध्ये दागिने चोरीचा प्रयत्न**

**पुणे :** पीएमपी बसमधील प्रवासी महिलांच्या दागिन्यांवर डोळा ठेवणारी एक महिला चोरटी छत्रपती शिवाजी महाराज रोड परिसरात रंगेहात पकडली गेली. प्रवासी महिलेच्या तत्परतेमुळे हा प्रकार उघड झाला असून झटापटीत चोरट्याने कटरने केलेल्या वारात ती महिला जखमीही झाली. अश्विनी अविनाश भोसले (वय २९, रा. गंगेवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत ५३ वर्षीय महिलेने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला रविवारी (१६ नोव्हेंबर) दुपारी महापालिका ते वसंत चित्रपटगृह या मार्गावर पीएमपी बसने प्रवास करत होती. बसमध्ये गर्दीचा फायदा घेत आरोपी भोसलेने कटरच्या सहाय्याने महिलेचे मंगळसूत्र कापण्याचा प्रयत्न केला. मात्र हा प्रकार महिलेच्या लक्षात आला आणि तिने आरडाओरडा केल्याने प्रवाशांनी भोसलेला पकडण्याचा प्रयत्न केला.

# आयुक्त साहेब एकदा हडपसर परिसराची पाहणी करा

## नागरिकांची मागणी : रस्ते, पिण्याचे पाणी, कचरा समस्या, कालव्याती दुर्गंधी, अतिक्रमणांमुळे वाहतुकीचा बोजवारा

**पुणे :** हडपसर आणि परिसरातील रस्ते, पिण्याचे पाणी, कचरा समस्या, कालव्याती दुर्गंधी, अतिक्रमणांमुळे वाहतुकीचा बोजवारा, आरोग्य सेवेची ऐशीतैशी अशा एक ना अनेक समस्या वारंवार करूनही त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना अनेक समस्यांचा नागरिकांना सामना करावा लागत आहे, त्यासाठी आयुक्तसाहेब तुम्ही एकदा हडपसर परिसराची पाहणी करावी, अशी आर्जवी मागणी सामान्य नागरिकांकडून केली जात आहे. हडपसर क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनेक वर्षांपासून अधिकारी-कर्मचारी कार्यरत असून, ते माजी नगरसेवक, इच्छुकांच्या समस्या सोडविण्यात मश्गूल झाले आहेत. मात्र, सामान्य नागरिकांची तक्रार ऐकूण घेण्याची मानसिकता नाही किंवा त्यांना गरज पडत नाही. राजकारण्यांचा वरदहस्त असलेल्या आणि अनेक वर्षे मुक्काम ठोकलेल्या मंडळींना येथून का हलवले जात नाही, ठराविक कालावधीनंतर त्यांची बदली अपेक्षित असते. मात्र, ते होताना दिसत नाही, अशी तक्रार हडपसर-ससाणेनगर नागरी कृती समितीचे दिलीप गायकवाड यांनी केली आहे. गायकवाड म्हणाले की, कालवा पाणी वाहून जाण्यासाठी आहे की, कचराकुंडी आहे, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. हडपसरमधून दोन कालवे वाहतात. खडकवासला धरणातील पाणी थेट इंदापूर-दौंडपर्यंत शेतीसाठी दिले जात आहे. कालव्यातील पाण्याचा प्रवाह बंद असतो, त्यावेळी कालव्यात मृत जनावरे, कचऱ्याचा ढीग, डुकरांचा सुळसुळाट, कुत्री, उंडरांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. कालव्याची स्वच्छता आणि देखभाल नेमकी कोणी करायची आहे असा प्रश्न आहे. पालिकेकडे तक्रार केली, तर पाटबंधारे विभागाला सांगा आणि पाटबंधारे विभागाकडे तक्रार केली, तर महापालिकेची जबाबदार आहे, असे सांगितले जात आहे. त्यामुळे नागरिकांनी नेमकी तक्रार कोणाकडे करायची असा प्रश्न असल्याचे त्यांनी सांगितले.



परिसरातील मलवाहिनी आणि जलवाहिनी वारंवार फुटतात. त्या दुरुस्त करण्यासाठी तत्परता दाखवली जात नाही. जलवाहिनीतून हजारो लीटर पाणी वाया जाते, तरी त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, अशी तक्रार अमोल तोष्णीवाल, मिलिंद वाडकर, शैलेश चव्हाण, मयूर फडतरे, गोविंद कुंजीर यांनी यांनी केली.

> हडपसरमधून वाहणाऱ्या दोन कालव्यांमध्ये मृत जनावरांचे अवशेष, कचऱ्याचे ढीग, डुकर, कुत्री आणि उंदरांचा वावर वाढल्याचे दिसून येते. "कालव्यातील पाण्याचा प्रवाह ठप्प असतो; पालिकेने पाटबंधारे विभागाला सांगा, पाटबंधारे विभागाने महापालिकेकडे सांगा – नागरिकांना नेमके तक्रार कोणाकडे करावी असा प्रश्न निर्माण झाला आहे,"
> **-मयूर फडतरे, हडपसर**

> मलवाहिनी फुटली किंवा तुंबली तर दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असते, त्यामुळे अनारोग्य पसरून आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार पालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांना कोणी दिला.
> **-दिलीप गायकवाड, हडपसर**

> नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतर तातडीने संबंधित विभागाला सूचना देऊन काम करून घेतले जात आहे. कालव्यातील पाण्याचा प्रवाह बंद झाल्यानंतर अनेक नागरिक त्यामध्ये कचरा टाकतात, त्यांच्यावरही कारवाई केली जात आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नका, असे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.
> **-रवी खंदारे, सहायक आयुक्त, हडपसर क्षेत्रीय कार्यालय**

# शिक्रापुरात चार पायाची कोंबडी पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी



**शिक्रापूर :** शिरुर येथील एका चिकन व्यवसायिकाच्या दुकानात चक्क चार पायांची कोंबडी आढळून आल्याने ती पाहण्यासाठी पक्षीमित्रांसह नागरिकांनी गर्दी केली आहे.

शिक्रापूर येथील सिकंदर शेख यांचा चिकन व्यवसाय आहे. त्यांच्या दुकानात दररोज कोंबड्या येतात. त्यंनी दुकान उघडून कोंबड्यांना खाद्य टाकत असताना त्यांना अचानक कोंबडीला चार पाय असल्याचे दिसून आल्याने त्यांनी तातडीने त्यांचा मुलगा शेरखान शेख यास माहिती दिली. त्यानंतर सेवानिवृत्त सहाय्यक पशुवैद्यकीय आयुक्त डॉ. राजेंद्र त्र्यंबके, प्राणीमित्र अमोल कुसाळकर, गणेश टिळेकर, शुभांगी टिळेकर यांसह अनेक प्रणी पक्षीमित्रांनी या कोंबडीची मोठ्या कुतुहुलाने पाहणी केली. त्यावेळी चक्क एका कोंबडीला पूर्ण वाढ झालेले चार पाय आणि चारही पायांना स्वतंत्र नख्या असल्याचे दिसून आले.

दरम्यान, सेवानिवृत्त सहायक पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. त्र्यंबके म्हणाले की, आम्ही आजपर्यंत अनेक प्राणी पक्षी पाहिले. मात्र, चार पायंची कोंबडी प्रथमच पाहिली आहे. हा प्रकार एका जनुकीय बदलामुळे हा प्रकार घडतो आणि पॉलिमेलिया ही जन्मजात स्थिती असल्याचे त्यांनी सांगितले.

# ससाणेनगर कालव्यावरील पूल धोकादायक

## प्रशासन जागे कधी होणार : पुलाचे काम तातडीने सुरू करा अन्यथा आंदोलन

**पुणे :** हडपसर महंमदवाडी रस्त्यावरील कालव्यावर उभारलेल्या पुलाचा एक खांब ढासळला आहे. त्याला तकलादू पत्र्याचा आधार दिला असला तरी रात्री-अपरात्री एखादे वाहन धडकून थेट कालव्यात कोसळण्याचा धोका वाढला आहे. मागिल चार महिन्यांपासून ही परिस्थिती ओढवली असूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई का केली जात नाही, अशी विचारणा ससाणेनगर, काळेबोराटेनगर, महंमदवाडी, उंड्री, पिसोळी, हांडेवाडी, होळकरवाडी, सय्यदनगर, ससाणेवस्ती, चिंतामणीनगर व सातवनगरमधील नागरिकांनी दै. राज्य लोकतंत्रकडे केली आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र ड्युटी यांनी कुंडमळा येथे झालेल्या पुलाच्या अपघातानंतर सर्व विभागांना पुणे जिल्ह्यातील प्रत्येक पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, पुणे महानगरपालिकेने या बाबीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे. दुर्घटना घडल्यानंतर ९० दिवसांचा कालावधी उलटला आहे. या पुलावर दररोज हजारो वाहने धावतात. भल्या पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत वाहनांची वर्दळ सातत्याने सुरू असते.



हडपसर परिसरातील शैक्षणिक संकुले, बँका, महाविद्यालये, भाजी मंडई, क्षेत्रीय कार्यालय, हॉस्पिटल, पीएमटी, औद्योगिक वसाहती आणि खाजगी संस्थामधील नागरिकांना या पुलाचा वापर करावा लागत आहे. याविषयी वारंवर तक्रार करूनही त्याकडे प्रशासनाकडून गांभीर्याने पाहिले जात नाही, अशी तक्रार ससाणेनगर नागरिक समितीचे सदस्य अर्जुन सातव, योगेंद्र गायकवाड, डॉ. अनिल पाटील, राजेंद्र भिंताडे, कल्पना हांडे यांनी केली.

> "उड्डाणपूलचे काम सुरू करण्यापूर्वी कालव्या वरील दोन्ही बाजूला असलेले रस्ते डांबरीकरण करून पर्यायी मार्ग निर्माण करणे गरजेचे आहे, नाही तर वाहतूककोंडी नाही, तर नागरिकांचा जीव कोंडला जाईल.
> **-उल्हास तुपे,** शासननियुक्त नगरसेवक, हडपसर

> तीन महिन्यांपासून फक्त पत्रक लावल्यामुळे रस्ता अरुंद झाला असून, आधीच वाहतुकीची कोंडी अधिकच वाढली आहे. पुणे महापालिकेने तातडीने कारवाई करून या भागातील नागरिकांचे जीवित व सुरक्षिततेचे रक्षण करणे गरजेचे आहे.
> **-दिपाली माटे, हडपसर**

## हडपसरहून २६ जानेवारीपासून थेट नांदेड-हरंगुल गाड्या

**पुणे:** पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी दोन महत्त्वाच्या गाड्यांचे प्रस्थान आता हडपसर टर्मिनलवरून होणार आहे. हडपसर टर्मिनलचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून २६ जानेवारीपासून हा मोठा बदल अमलात येत आहे.

नवीन ट्रेन व्यवस्था : हडपसर – हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस रात्री ९.५० वाजता हडपसरहून प्रस्थान. हजूर साहिब नांदेड – हडपसर एक्स्प्रेस पहाटे ४.३५ ला हडपसर आगमन. हडपसर – हरंगुल स्पेशल सकाळी ६.२० वाजता प्रस्थान. हरंगुल – हडपसर स्पेशल —रात्री ८.४५ वाजता आगमन.

हरंगुल स्पेशलचे थांबे : लोणी, उरळी, यवत, केडगाव, पाटस, दौंड कॉर्ड लाईन. हडपसर—पुण्याचा नवा रेल्वे हब! सध्या हडपसरहून १२ गाड्या सुटतात आणि १० गाड्यांना थांबा आहे. आता आणखी गाड्या हडपसर, खडकीकडे वळवण्याची तयारी सुरू आहे. पूर्व पुणे, सोलापूर रोड परिसरातील प्रवाशांसाठी हा निर्णय निश्चितच दिलासादायक. पुणे स्थानकावरील गर्दी, वाहतुकीचा गोंधळ आणि वेळेची बचत—सर्वच बाबतीत हा बदल 'गेमचेंजर' ठरणार आहे.

# सर्दी-खोकला-हृदयविकाराची धोक्याची घंटा वाजली

## डॉ. एम. बी. आबनावे : पुणे आणि उपनगरांत थंडीची जोरदार लाट

**पुणे :** पुणे आणि उपनगरांत थंडीची जोरदार लाट, पारा घसरला आहे. त्यामुळे शहरातील नागरिक आता फक्त थंडीनेच नव्हे, तर आरोग्याच्या ताणामुळेही गारठले आहेत. सर्दी, ताप, खोकला, घसा खवखवणे, डोकेदुखी या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत असून, अस्थमा, संधिवात किंवा हृदयविकाराचा त्रास असलेल्या नागरिकांना तज्ज्ञांचे विशेष आवाहन आहे – काळजी घेणे आता गरजेचे आहे, असे डॉ. एम. बी. आबनावे यांनी सांगितले.

डॉ. आबनावे म्हणाले की, थंडीत धमन्या व शिरा घट्ट होतात, रक्त जाड होऊन रक्ताभिसरण मंद होते. हृदयाला जास्त मेहनत करावी लागते, ज्यामुळे हिवाळ्यात हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका उभा राहतो. उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल किंवा मधुमेह असणाऱ्यांनी व्यायाम करताना वॉर्म अप करून, वारंवार ब्रेक घेतल्याशिवाय व्यायाम करू नये. दम्याच्या रुग्णांनी इनहेलर सोबत ठेवणे आवश्यक आहे. उबदार कपडे परिधान करा, संतुलित आहार घ्या, पुरेशी झोप घ्या, व्यायाम करा, वैयक्तिक स्वच्छता ही आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, डॉ. अनिल पाटील म्हणाले की, पुणेकरांनो, थंडीचा सामना फक्त उबदार कपड्यांनीच नाही, तर सावधगिरी, संतुलित आहार आणि वेळेत उपचार घेऊन करावा लागणार आहे. उबदार रहा: थंडीमध्ये जाड कपडे, टोपी, शाल आणि हातमोजे न विसरता परिधान करा. संतुलित आहार, गरम पदार्थ प्राधान्याने घ्या. पुरेशी झोप आणि हलका व्यायाम आवश्यक आहे. हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह असलेल्यांनी वॉर्म अप करून व्यायाम करा. दम्याच्या रुग्णांनी इनहेलर सोबत ठेवा. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळा. थंड पेये, आईस्क्रीम, बर्फाचे पदार्थ टाळा. धूम्रपानाने श्वसनसंबंधी धोका वाढतो. डॉक्टरांचा सल्ला घेऊन औषधांचा वापर करा. जास्त ताप, श्वास घेण्यात त्रास, त्वचा/ओठ निळसर, थुंकीत रक्त लगेच रुग्णालयात जाऊन उपचार करून घ्यावेत, असे त्यांनी नमूद केले.

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे म्हणाल्या की, "वृद्ध, गरोदर महिला, लहान मुले, सहव्याधी व दीर्घकालीन आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. सर्दी, ताप, खोकला, घशात खवखव, धाप, अंगदुखी दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. जास्त ताप, श्वास घेण्यास त्रास, त्वचा किंवा ओठ निळसर, थुंकीत रक्त आढळल्यास ताबडतोब रुग्णालयात जाऊन उपचार करून घ्यावेत, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

# हरवलेली सोन्याची अंगठी महिलेने केली परत

## चारुलता भेके यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

**आळेफाटा :** कलियुगात प्रामाणिकपणा दुर्मिळ झाल्याचे पदोपदी अनुभवत येत आहे. मात्र, त्याला एक महिला अपवाद ठरली आहे. मंगल कार्यालयात सुरू असलेल्या साखरपुडा समारंभाच्या वऱ्हाडी मंडळींच्या गर्दीत जमिनीवर पडलेली एक सोन्याची अंगठी या महिलेला सापडली होती. त्यानंतर त्या अंगठीच्या मालकीणीचा शोध घेऊन व अंगठीची ओळख पटवून खऱ्या अंगठी मालक महिलेकडे ती प्रामाणिकपणे परत केली आहे.

चारुलता उत्तम भेके (वय ५०, रा. भोकेमळाष कळंब, ता.आंबेगाव, जि.पुणे) असे प्रामाणिक उद्योजक महिलेचे नाव आहे. त्यांचे ओतूर (ता.जुन्नर) येथे माहेर आहे, त्याशिवाय त्यांचे श्रीकृष्ण ॲग्रो इंडस्ट्रीज या नावाने जुन्नर तालुका औद्योगिक वसाहतीत ऑरगॅनिक खते बनविण्याचा कारखाना आहे. दरम्यान, संगीता जाधव या मैत्रिणीच्या मुलाच्या साखरपुडा समारंभाला गेल्या होत्या. त्यांना खूर्ची खाली पडलेली अंगठी चारुलता भेके यांना मिळून आली होती. त्यांनी अंगठी मालकाचा शोध घेतला असता ती अंगठी आपलीच मैत्रीण उंब्रज नं १ (ता.जुन्नर) येथील आदर्श शिक्षिका रुकसाना जमादार या मैत्रिणींची असल्याची खात्री झाली. त्यांच्या प्रामाणिकपणे परत केली असून, त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले जात आहे.




# कळंब–चांडोलीत राजकीय समीकरण बदलले

**रांजणी :** आंबेगाव तालुक्यातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा कळंब–चांडोली जिल्हा परिषद गट महिला सर्वसाधारण राखीव घोषित होताच राजकीय समीकरणांचा तापमान अचानक वाढले आहे. महायुतीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी तुलसी सचिन भोर यांना संभाव्य उमेदवार म्हणून पुढे केले असतानाच शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या प्रीती प्रवीण थोरात या महाविकास आघाडीत प्रवेश करून राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडून उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या आहेत.

या घडामोडींमुळे या गटातील निवडणूक चुरशीची होणार हे निश्चित झाले आहे. विधानसभा मतदारसंघातील समीकरणांचा प्रभाव गेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार दिलीप वळसे–पाटील यांना या गटात दोन हजारांहून अधिक मते कमी पडली होती, तर महाविकास आघाडीचे उमेदवार देवदत्त निकम यांना आघाडी मिळाल्याचे वास्तव अजूनही दोन्ही पक्ष विसरू शकलेले नाहीत. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत या मतदारसंघाचा कल कोणाकडे झुकतो याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**तुलसी भोर यांच्यावरील नाराजी**

सन २०१७ च्या निवडणुकीत तुलसी भोर यांनी प्रीती थोरात यांचा पराभव केला होता. मात्र तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध होती. पक्षफुटीनंतर निर्माण झालेल्या द्विपक्षीय परिस्थितीत तुलसी भोर यांच्यावरील नाराजी प्रखर झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. मतदारांशी संपर्क कमी ठेवणे, कामकाजात निष्क्रियता आणि गटातील जनतेपासून दुरावा... या सर्व बाबींमुळे पक्षातही उमेदवारीबाबत संभ्रम असल्याचे दिसते.

**प्रीती थोरात यांचे पारडे जड?**

शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या प्रीती प्रवीण थोरात या राष्ट्रवादी (शरद पवार गट) मध्ये प्रवेश करीत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. शिंदे शिवसेना, उबाठा गट आणि राष्ट्रवादी (श. प.) या पक्षांमध्ये प्रभाव असल्याने स्थानिक पातळीवर त्यांच्या बाजूने मजबूत असल्याचे मानले जाते. महाविकास आघाडीत एकजूट; 'अजितदादा' गट : राजकीय घडामोडींचा वेध घेतला असता शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (एकनाथ शिंदे), भाजप आणि काँग्रेस आय पक्ष हे सर्व पक्ष आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत एकत्र येण्याची चिन्हे दिसत आहेत. तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) मात्र स्वतंत्रपणे रिंगणात उतरणार असल्याचे स्रोत सांगतात. वरिष्ठ स्तरावर बंद दरवाज्याआड अनेक गुप्त बैठका झाल्याची माहितीही समोर आली आहे. तुलसी भोर यांना उमेदवारी मिळाली, तर फटका निश्चित? स्थानिक नाराजी, विधानसभा निवडणुकीतील घसरण आणि सध्याच्या राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर तुलसी भोर यांना उमेदवारी दिल्यास राष्ट्रवादी (अजित पवार गट) ला फटका बसण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. एकूणच...कळंब–चांडोली हा मतदारसंघ केवळ प्रतिष्ठेचा नव्हे, तर तालुक्यातील भविष्यातील राजकीय दिशा ठरवणारा गट ठरणार आहे. आगामी दिवसांत कोणाला उमेदवारी मिळते, कोणाची आघाडी होते आणि जनता कोणाच्या बाजूने उभी राहते—यावर तालुक्याचे राजकारण कलाटणी घेईल, एवढे मात्र स्पष्ट आहे.

# पीएमआरडीएच्या गुंठेवारी योजनेला अल्प प्रतिसाद

**पुणे :** महानगर प्रदेशातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी पीएमआरडीएने दोन वर्षे 'संधीची खिडकी' उघडी ठेवली... पण नागरिकांनी मात्र या खिडकीकडे पाठच फिरवली आहे. सुमारे दहा हजार अनधिकृत बांधकामे असताना केवळ २०० प्रस्ताव दाखल झाल्याचे धक्कादायक वास्तव प्राधिकरणासमोर आले असून, आता कारवाईचे ढग गडद होताना दिसत आहेत.

पीएमआरडीएच्या ७०० गावांच्या हद्दीत निवास झोनमधील गुंठेवारी बांधकामे नियमित करण्यासाठी राज्य शासनाने २००१ च्या अधिनियमात सुधारणा करून मोठी सवलत दिली होती. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी उभारलेली बांधकामे नियमबद्ध करण्याची सुवर्णसंधी नागरिकांना दिली.

## आता कारवाईचा बडगा उगारणार?

नोंदणीकृत वास्तुविशारद किंवा स्थापत्य अभियंतामार्फत अर्ज दाखल करणे हा केवळ तांत्रिक औपचारिकतेचा मुद्दा आहे. मात्र, प्रत्यक्षात नागरिकांनी 'उद्याचे-उद्याचे' म्हणून अर्ज टाळल्याचे चित्र पीएमआरडीएसमोर स्पष्ट झाले आहे. नगरपालिकेकडे विलीन झालेल्या २३ गावांचे बांधकाम परवानगी अधिकार पीएमआरडीएकडे आहेत. या परिसरांत आणि शहरालगतच्या गावांत तर गेल्या दशकात अनधिकृत बांधकामांचा अक्षरशः पूर आला. मोठमोठ्या इमारती, व्यावसायिक गाळे, गुंठेवारी प्लॉटिंग—सर्व काही धडाधड उभे राहिले. पण ते नियमित करण्यासाठी अपेक्षित नागरिकांचा सहभाग मात्र जवळजवळ शून्य. मुदतवाढींचा खेळही इथे थांबला नाही. प्राधिकरणाने आधी ३१ मार्च, नंतर आणखी सहा महिने, म्हणजे ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली. पण अखेरची तारीखही शांतपणे उलटून गेली आणि अर्जांची संख्या नगण्यच राहिली. अर्ज तपासणीदरम्यान पीएमआरडीएला जे आढळले, त्याने अधिकाऱ्यांची चिंता अधिकच वाढवली—दोन वर्षांची संधी, दोनदा मुदतवाढ... तरीही नागरिकांचा प्रतिसाद नाही. आता प्राधिकरणाच्या संयमाचा अंत होईल का? पुढील काही महिने पीएमआरडीए हद्दीत अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा मोर्चा निघण्याची चिन्हे ठळकपणे दिसत आहेत.

प्रा. अरुण झांबरे म्हणाले की, पीएमआरडीएकडून नागरिकांपर्यंत नियमावली पोहोचवली पाहिजे. अनेक नागरिकांना त्या माहिती नसल्याने त्याविषयी गांभीर्याने पाहिले जात नाही, असे त्यांनी सांगितले.

> **परवानगीपेक्षा जादा एफएसआय वापर**
> साईड मार्जिन न सोडणे, अरुंद रस्त्यांवर व्यावसायिक इमारती शेती झोन, नो-डिव्हलपमेंट झोन, हिल-टॉप–हिल-स्लोप झोनमध्येही धडधड बांधकामे! हे सर्व पाहता 'स्वतःहून नियमित होण्याची' अपेक्षा आता धूसर दिसत असून पुढचा टप्पा म्हणजे कडक कारवाईचा बडगा उचलण्यास पीएमआरडीए भाग पाडले जाण्याची शक्यता वाढली आहे.

# राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**शिक्रापूर :** केंदूर (ता.शिरुर)येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज विद्यालयाचे कलाशिक्षक संजय जोहरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षक शिक्षकेत्तर संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने २०२५ चा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

यांप्रसंगी व्हिक्टोरिया मुत्तुम, राहुल मोरे, दीपक चौने, रावसाहेब मिरगणे, घनश्याम भैसले, वैभव गीते, संघटनेचे अध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव सत्यजित जानराव, संजय चौधरी, शिक्षक प्रशांत गांजरे, मनोज दोंड यांसह आदी उपस्थित होते.




**केंदूर, रा. शिरुर येथील कलाशिक्षक संजय जोहरे यांना सन्मानित करताना पदधिकारी.**

केंदूर येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज विद्यालचे कलाशिक्षक संजय जोहरे यांनी शैक्षणिक क्षेत्रात विशेष योगदान देत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्वतः पुढाकार घेत विविध उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षक शिक्षकेत्तर संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आंतरराष्ट्रीय शांतता शिक्षण विभागाच्या भारतातील संचालक व्हिक्टोरिया मुत्तुम यांच्या हस्ते राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## मांडवगण-फराट्यात युवतीचा विनयभंग करणाऱ्यावर गुन्हा

**शिक्रापूर :** शिक्रापूर : मांडवगण-फराटा (ता. शिरूर) येथे घरासमोर उभी असलेल्या एका युवतीचा विनयभंग करून तिला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवा अंकुश शिंदे (रा. न्हावरा, ता. शिरूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पीडितेने शिरूर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली आहे.

पोलिसांनी सांगितले की, संबंधित युवती घरासमोर असताना आरोपी देवा शिंदे तिच्याजवळ येऊन बोलण्याचा प्रयत्न करू लागला. तिने त्याला नकार दिल्यानंतर त्याने तिचा हात पकडत तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यानंतर युवतीने विरोध दर्शवत "मला तुझ्याशी बोलायचे नाही" असे सांगितल्यावर आरोपीने शिवीगाळ करत दमदाटी केली आणि "तुझे कोठेही लग्न होऊ देणार नाही," अशी धमकी दिली. पुढील तपास पोलीस हवालदार संपत खबाले करीत आहेत.

## सादलगावात ॲट्रॉसिटी गुन्हा मागे घेण्यासाठी दांपत्याला मारहाण

**शिक्रापूर :** सादलगाव (ता. शिरूर) येथे जुन्या ॲट्रॉसिटी प्रकरणाची तक्रार मागे घेण्यासाठी ज्येष्ठ दांपत्याला घरात घुसून मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर हनुमंत पवार व गुलाब अशोक पवार (दोघे रा. सादलगाव) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले की, गावातील व्हॉट्सॲप ग्रुपवर ऑगस्ट २०२५ मध्ये झालेल्या वादातून पवार-अडसूळ कुटुंबांत हाणामारी झाली होती. त्या घटनेनंतर वत्सला अडसूळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अविनाश पवार यांच्यासह चौघांवर ॲट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. नुकताच घडलेल्या प्रकारात वत्सला अडसूळ आणि त्यांचे पती रामदास अडसूळ घरी असताना सागर पवार व गुलाब पवार हे दोघे घरात येऊन "आमच्याविरुद्ध केलेली जुनी ॲट्रॉसिटीची केस मागे घ्या" असा दम दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दांपत्याने नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात वत्सला अडसूळ आणि त्यांच्या पतीस दुखापत झाली. त्यानंतर वत्सला अडसूळ (वय ६३) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दोघांवर संबंधित गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले करीत आहेत.

## बोऱ्हाडे मळ्यात अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

**शिक्रापूर :** बोऱ्हाडे मळा (ता. शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावर रस्ता ओलांडताना एका बिबट्याला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तो ठार झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. वनविभागाने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून मृत बिबट्याचे दहन करण्यात आले आहे. रविवारी (दि. १६ नोव्हेंबर) रात्री सुमारे साडेनऊच्या सुमारास अहिल्यानगरकडून येणाऱ्या अज्ञात वाहनाची जोरदार धडक बसल्याने बिबट्या गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक गणेश झिरपे, अभिजित सातपुते, तसेच वनविभागाच्या बिबट्या शीघ्र कृती दलातील दिनेश गोरड आणि अनिकेत बोऱ्हाडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. वनपरिक्षेत्र अधिकारी गव्हाणे म्हणाले की, "अपघातात मृत बिबट्या हा अंदाजे दोन वर्षांची मादी असून, त्याचे शवविच्छेदन करून नियमानुसार दहन करण्यात आले आहे."

# दर्जेदार शिक्षणाला धक्का" योजना तत्काळ थांबवा

### कॅरी ऑन योजनेला उच्च न्यायालयाचा अडथळा : खंडपीठाचा आदेश



**पुणे :** राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेत खळबळ उडवणारा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. अनेक विषयांत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात प्रवेश देणारी 'कॅरी ऑन' योजना ही दर्जेदार शिक्षणाच्या उद्दिष्टाला हरताळ फासणारी असल्याची कडक टीका करत न्यायालयाने योजनेवर तत्काळ स्थगिती आणण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने हा निर्णायक आदेश देत विद्यापीठांच्या मनमानीला स्पष्ट आळा घातला आहे. चालू वर्षात कोणालाही लाभ नाही खंडपीठाने स्पष्ट केले की २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एकाही विद्यार्थ्याला कॅरी ऑनचा लाभ देता येणार नाही. १७ जानेवारी २०२५ च्या परिपत्रकानुसार आतापर्यंत ज्यांना लाभ दिला आहे, त्यांच्या निकालावरचा निर्णय अंतिम आदेशाच्या अधीन राहील. तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांना २९ नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे आपली भूमिका मांडण्याचे निर्देश देण्यात आले असून पुढील सुनावणी १० डिसेंबरला होणार आहे.

याचिका एका विद्यार्थ्याची; परिणाम राज्यभरचा : ही कारवाई सुरू झाली ती पुणे विद्यापीठातील एका एलएलबी विद्यार्थ्याच्या याचिकेमुळे. पहिल्या वर्षाच्या आठही विषयांत तो अनुत्तीर्ण होता. पुनर्मूल्यांकनात आणि ग्रेस गुणांनी तीन विषयांत तो मानाने पास झाला; मात्र पाच विषयांत अद्याप नापासच. अशा परिस्थितीत त्याने दुसऱ्या वर्षाचा प्रवेश रद्द झाल्यानंतर थेट तिसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची मागणी न्यायालयात केली.

या विचित्र मागणीवरच न्यायालयाने प्रश्न उपस्थित करत योजनेचे तर्कशास्त्र धसकावले. इंजिनिअरिंगपुरती योजना; पण विद्यापीठांची मनमानी वाढली सुनावणीत उघड झाले की ही योजना केवळ २०२४-२५ साठी आणि तेही फक्त इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी मर्यादित होती. तरीही जळगाव, सोलापूर, अमरावती आणि कोल्हापूर विद्यापीठांनी २०२५-२६ मध्ये आणि इतर सर्व शाखांमध्येही कॅरी ऑन सुरू ठेवली. न्यायालयाने या मनमानीवर स्पष्ट नाराजी व्यक्त करत "ही योजना आणि तिचा विस्तार कसा न्याय्य?" असा थेट सवाल केला. कोरोनानंतर चार वर्षे—तर मग कॅरी ऑन कशासाठी? राज्य सरकारच्या प्रतिज्ञापत्रात नमूद होते की लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर ही योजना आणण्यात आली. यावर बोट ठेवत खंडपीठाने स्पष्ट निरीक्षण नोंदवले.

कोरोना काळाला चार वर्षे लोटली, विद्यार्थी नियमित परीक्षा देतात आणि उत्तीर्णही होतात, मग २०२४-२५ साठी ही योजना आणण्याची गरज काय? न्यायालयाने योजनेच्या हेतू, तर्क आणि शैक्षणिक आधारावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शिक्षण क्षेत्रासाठी स्पष्ट संदेश : उच्च न्यायालयाने दिलेला हा आदेश म्हणजे अनुत्तीर्ण विद्यार्थी पुढे ढकलण्याच्या रिवाजाला मोठा ब्रेक. दर्जेदार शिक्षणव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी "सहज पास" संस्कृतीला जागा नाही, असा स्पष्ट

## दोन्ही शिवसेनेची चाकण नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी युती

**पिंपरी :** चाकण नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी शिवसेना (ठाकरे) आणि शिवसेना (शिंदे) या दोन्ही शिवसेनेची युती झाली आहे. शिवसेनेकडून (शिंदे) माजी आमदार दिवंगत सुरेश गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरल्या आहेत. त्यांना शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार बाबाजी काळे यांनी पाठिंबा दिला आहे. शिवसेनेची विभागणी झाली असली, तरी गोरे कुटुंबाचे पक्षासाठीचे योगदान, सहकार्य आणि सहानुभूती पाहून पाठिंबा दिल्याचे काळे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या युतीवरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी आमदार दिलीप मोहिते यांनी आमदार काळे यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

शिवसेनेकडून (शिंदे) माजी आमदार दिवंगत सुरेश गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरल्या आहेत. मनीषा गोरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेनेचे (ठाकरे) आमदार बाबाजी काळे, शिवसेनेचे (शिंदे) जुन्नरचे सहयोगी आमदार शरद सोनावणे यांच्यासह दोन्ही शिवसेनेचे तालुक्यातील नेतेही उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, 'सुरेश गोरे हे २०१४ मध्ये शिवसेनेचे आमदार होते. करोना काळात त्यांचे निधन झाले. शिवसेनेत फूट पडल्यानंतर खेड तालुक्यातील काही जण एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. सुरेश गोरे यांनी तालुक्याचे नेतृत्व केले. त्यांच्या मार्गदर्शनातून आम्ही घडलो. मी मूळ शिवसेनेकडून (ठाकरे) २०२४ मध्ये आमदार म्हणून निवडून आलो. गोरे कुटुंबासह शिवसेना (शिंदे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीत मला सहकार्य केले. सुरेश गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवत आहेत, असे त्यांनी सांगितले.

# जंक, फास्ट फूडमुळे कर्करोगाचा धोका

### प्रा. अडसुळे : शिर्डीतील श्री साईबाबा संस्थानमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**पुणे :** विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या प्रमाणात पॅक फूड, फास्ट फूड आणि बाहेरच्या पदार्थांची अंगवळणी पडलेली सवय आहे. त्यामुळे भविष्यात डायबेटीस, बीपी, स्थूलता ते कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढत असल्याचे प्रा. सुनील अडसुळे यांनी सांगितले.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीने विविध शैक्षणिक संकुलांतील विद्यार्थ्यांसाठी मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड येथील प्रा. सुनील अडसुळे यांना मार्गदर्शन केले. अडसुळे यांनी आतापर्यंत २३८ शाळा-महाविद्यालयांमधील ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना जंक फूडचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले आहे. शिर्डी संस्थानच्या इंग्रजी माध्यम शाळा, कन्या शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये तसेच आयटीआय विभागातील ४,७०० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

प्रा. अडसुळे यांनी चारधाम यात्रेदरम्यान उत्तराखंडमधील तीन शाळांत, तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशातील विविध शिक्षणसंस्थांत जनजागृतीपर व्याख्याने दिली आहेत. यावेळी शिर्डी संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी दराडे यांनी त्यांचा सन्मान केला. राजू कोहकडे यांनी सूत्रसंचालन केले.प्राचार्य अवताडे व प्राचार्य तांबोळी यांनी समन्वयाची जबाबदारी सांभाळली.

# भरत शहा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल

### कार्यक्रमाला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित : विकासासाठी निधीची ग्वाही

**इंदापूर :** "मी पिढीजात पैसेवाला आहे; माझ्या कुटुंबाने कधीही वाममार्गाने पैसा कमवला नाही" असे स्पष्ट सांगत जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांच्यावर थेट टीकास्त्र सोडले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात भरत शहा यांचा औपचारिक प्रवेश झाला. यावेळी त्यांनी गारटकरांवर निशाणा साधला. याप्रसंगी पक्षप्रवेश कार्यक्रमाला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, शहा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष मुकुंद शहा, जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे, मधुकर भरणे, तालुकाध्यक्ष हणुमंत कोकाटे, कार्याध्यक्ष अतुल झगडे, शहराध्यक्ष बाळासाहेब ढवळे आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

भरत शहा म्हणाले, "आम्ही पिढीजात श्रीमंत आहोत म्हणूनच माझ्या पक्षप्रवेशाला प्रदीप गारटकर विरोध करत होते. पैसेवाल्यांना उमेदवारी देऊ नये, निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय होतो—असे सांगून ते मला रोखत होते." हर्षवर्धन पाटील यांच्यासोबत असताना आपल्या पदांचा राजीनामा दिल्यानंतरच पक्षप्रवेशाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

कोरोना काळात प्रत्यक्ष सेवेचा वारसा"

**३४७ कोटींचा पूल प्रकल्प— अजित पवारांचा ठसा**

शहा म्हणाले,"व्यापारी संघटनेच्या मागणीनुसार शिरसोडी-कुगाव उजनी जलाशयावरील पूल प्रकल्पाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ ३४७ कोटींचा निधी दिला. या पुलामुळे इंदापूरची बाजारपेठ व्यापक होणार आहे." भविष्यात अजित पवार यांच्या




राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश करताना भरत शहा

नेतृत्वातून मोठा विकास होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**"शहा यांना जनता पसंत करते" : भरणे**

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, "भरत शहा यांना पक्षात घेण्यासाठी मी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उत्सुक होतो. परंतु जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांच्या नकारामुळे प्रवेश उशिरा झाला. शहरातील नागरिकांची पहिली पसंती भरत शहा आहेत." शहराच्या विकासासाठी लागणारा निधी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या मदतीने उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# सराईत टोळीला बेड्या; ४ पिस्टल व ५ काडतुसे जप्त

### काळेपडळ पोलिसांची कामगिरी

**पुणे :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात सुरू असलेल्या कोंबिंग ऑपरेशनदरम्यान काळेपडळ पोलिसांनी सराईत गुन्हेगारांच्या टोळीला जेरबंद केले. आरोपींकडून ४ गावठी पिस्टल आणि ५ जिवंत काडतुशांसह एकूण २.४२ लाखांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

आशिफ तेली, यश सुभाष मदने (२०, रा. बारामती) आणि प्रथमेश संदीप लोढे (२४, रा. वडगाव निंबाळकर, बारामती) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. काळेपडळ पोलीस ठाण्याचे अधिकारी पेट्रोलिंग करत असताना अंमलदार शाहीद शेख व दाऊद सय्यद यांना रेकॉर्डवरील गुन्हेगार आशिफ सबीरखा तेली (२१, रा. सय्यदनगर, हडपसर) हा दोन साथीदारांसह पालखी रोडवरील कच्च्या रस्त्यावर असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली. अंगझडतीत त्यांच्याकडून चार गावठी पिस्टल आणि पाच जिवंत काडतुशांचा मुद्देमाल सापडला. उपआयुक्त राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. कारवाईत अमित शेटे, पो.उपनिरीक्षक विनायक गुरव, तसेच पोलीस कर्मचारी प्रविण काळभोर, महादेव शिंदे यांनी सहभाग नोंदवला.

# मानसिक ताणात पुरुष 'जास्त असुरक्षित

### मदत मागणाऱ्यांमध्ये ६५% पुरुष, तर महिलांची संख्या केवळ ३५%

**पुणे :** मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत मदत मागण्यामध्ये पुरुष महिलांपेक्षा कितीतरी अधिक असुरक्षित आणि एकाकी अवस्थेत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. गेल्या दोन दशकांत मानसिक तणाव, नैराश्य, चिंता आणि आत्महत्येचे विचार येणाऱ्यांपैकी मदत मागणारे पुरुष ६५ टक्क्यांपर्यंत वाढले आहेत, तर महिलांचे प्रमाण फक्त ३५ टक्क्यांवर आहे. 'कनेक्टिंग ट्रस्ट' या मानसिक आरोग्यासाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थेच्या ताज्या अभ्यासातून हा निष्कर्ष निघाला आहे.

संस्थेकडून तणावग्रस्त, नैराश्यातील किंवा आत्महत्येच्या उंबरठ्यावर असलेल्या व्यक्तींसाठी हेल्पलाइन, समुपदेशन आणि प्रत्यक्ष सहाय्य अशा विविध सेवा चालवल्या जातात. गेल्या २० वर्षांच्या कॉल-डेटाचा अभ्यास करताना पुरुषांकडून मदत मागण्याचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे दिसून आले.

विशेषतः समाजात 'पुरुषांनी मजबूत असावे', 'कमजोरी दाखवू नये', 'भावना व्यक्त करू नयेत' अशा अपेक्षा असल्याने पुरुष मानसिक तणाव मनातच दाबून ठेवत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ताण वाढल्यानंतरच ते मदतीसाठी पुढे येतात. याउलट महिलांमध्ये भावना व्यक्त करणे, आधार घेणे, कुटुंबीयांशी बोलणे या गोष्टी तुलनेने सहज होत असल्याने त्यांच्यात गंभीर तणाव अत्यंत टोकाला जाण्याची शक्यता कमी असल्याचे अभ्यासात नमूद आहे.

कनेक्टिंग ट्रस्टच्या समुपदेशकांनी सांगितले की, "नैराश्य, अपयश, करिअरची धास्ती, नातेसंबंधातील अस्थिरता, आर्थिक दडपण या कारणांनी पुरुषांवरील मानसिक ओझे प्रचंड वाढत आहे. मदत घेण्याचे प्रमाण वाढणे ही सकारात्मक बाब असली तरी पुरुषांचा मानसिक थकवा भीषण प्रमाणात वाढत असल्याचे यावरून स्पष्ट होते." मानसिक आरोग्य क्षेत्रातील समुपदेशक याकडे एक चिंताजनक सामाजिक प्रवृत्ती म्हणून पाहत आहेत. "पुरुषांचा मानसिक आरोग्याविषयीचा संघर्ष अद्यापही समाजाच्या नजरेआड आहे. त्यांना योग्य वेळी आधार मिळणे अत्यंत गरजेचे आहे," असे तज्ज्ञांचे मत आहे. या अभ्यासातून 'मानसिक आरोग्य' हा विषय आता केवळ व्यक्तीगत नाही, तर सामाजिक आरोग्याचा गंभीर मुद्दा असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. पुरुषांवरील अदृश्य भावनिक भार ओळखून त्यांना संवाद, समुपदेशन आणि आधार मिळण्यासाठी समाजाने अधिक संवेदनशील होणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

# दौंड नगराध्यक्षपदासाठी दुर्गादेवी जगदाळे मैदानात

### राष्ट्रवादी (अजितदादा) गटाची उमेदवारी जाहीर

**दौंड :** नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) कडून दुर्गादेवी इंद्रजित जगदाळे यांनी सोमवारी (१७ नोव्हेंबर) आपला उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय उत्सुकता चांगलीच वाढवली. अर्ज दाखल करताना माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष रमेश थोरात, ज्येष्ठ कार्यकर्ते सोहेलखान, माजी नगराध्यक्ष इंद्रजित जगदाळे यांच्यासह पक्षातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

माजी नगराध्यक्ष इंद्रजित जगदाळे यांची कन्या आणि विरधवल जगदाळे यांची पुतणी असलेल्या दुर्गादेवी यांच्या नावावर गेल्या काही दिवसांपासून पक्षातील कार्यकर्त्यांचा जोरदार आग्रह होता. दौंड शहर व तालुक्यातील अनेक नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी त्यांना उमेदवारी देण्याची मागणी पक्षश्रेष्ठींकडे सातत्याने केली होती. अखेर या मागणीला आज मुद्रांक लागत दुर्गादेवी जगदाळे अधिकृत उमेदवार ठरल्या. नगराध्यक्ष पद हे ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असून दुर्गादेवी जगदाळे यांनी कुणबी जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे आपला अर्ज सादर केला आहे.

दुसरीकडे, कुल-काटारिया गटाने अद्याप आपला उमेदवार 'गुलदस्त्यात' ठेवला असून त्या गटाची घोषणा कधी होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (अजितदादा) व भाजप यांच्यात सरळ-सामना होण्याची शक्यता दाट असून निवडणूक अधिकच चुरशीची ठरणार, असे संकेत राजकीय वर्तुळातून व्यक्त केले जात आहेत.

# चंदेरी किल्ल्यावर १५० मीटर खोल दरीत थरार

### गवताच्या मुळांना धरून लोंबकळलेल्या गिर्यारोहकाची बचावफेरी यशस्वी

**वांगणी :** बदलापूर परिसरातील ऐतिहासिक आणि दुर्गप्रेमींच्या आवडत्या चंदेरी किल्ल्यावर शनिवारी दुपारी जीव थरारक प्रसंग घडला. चढाईदरम्यान १५० मीटर खोल दरीच्या काठावरून पाय घसरल्याने अभय पांडे हा गिर्यारोहक थेट उतारावर कोसळला. मात्र, हाताला गवताच्या मुळांचा आधार लागताच तो काठावर लोंबकळत अडकला. खाली उघडी दरी, वरून वाहणारे थंडगार पाण्याचे थेंब आणि सतत सरकणारी माती... क्षणाक्षणाला मृत्यूची चाहूल लागत असताना आसपासचे गिर्यारोहकही धास्तावले होते.

त्याचवेळी चंदेरीवर सरावासाठी गेलेल्या 'गिरीप्रेमी' संस्थेच्या पथकाला या गटाने मदतीसाठी हाक मारली. मिहीर जाधव, हेमंत जाधव, गुरु, विशाल गोदडे, रवी पवार, रवी पाटील, रुद्र मोहापात्रा, वंगेश गायकवाड आणि गणेश या पथकाने स्थितीचे गांभीर्य लक्षात येताच क्षणाचाही विलंब न करता बचाव मोहिमेचा धाडसी निर्णय घेतला.




मिहीर जाधव यांनी तातडीने दोरी दगडावर मजबुतीने सेट केली आणि जीव धोक्यात घालून थेट दरीकडे रॅपलिंग सुरू केले. ओले दगड, घसरता उतार आणि हलणारी माती यामुळे प्रत्येक पाऊल धोकादायक ठरत होते. अखेर पांडे यांच्यापर्यंत पोहोचून त्यांनी हार्नेस बांधला. वरून रवी पवार आणि रुद्र मोहापात्रा यांनी डिसेंडरद्वारे दोरी ताब्यात घेत अत्यंत काळजीपूर्वक वर खेचणे सुरू केले. तब्बल १५० मीटर खोल दरीच्या काठावर अवघे १५-२० मिनिटे सुरू असलेल्या या तणावपूर्ण मोहिमेनंतर अखेर अभय पांडे सुरक्षितपणे वर आणला गेला. त्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. दरम्यान, घटनेनंतर सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. "अशा तांत्रिक चढाईत योग्य प्रशिक्षण, सुरक्षा साधने आणि अनुभवी मार्गदर्शकांची उपस्थिती म्हणजे जिवाची हमी असते. प्रसंगावधान न दाखवले असते, तर प्रसंग गंभीर झाला असता," असे मिहीर जाधव म्हणाले.

अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे यांनी या पथकाचे कौतुक करताना सांगितले, "गिर्यारोहक हे राष्ट्राची संपत्ती आहेत. गिरीप्रेमी पथकाने दाखवलेले धाडस आणि कौशल्य अभिमानास्पद आहे. योग्य प्रशिक्षणाचे महत्त्व या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले." नंतर संस्थेने गिर्यारोहकांना सुरक्षाविषयक सूचना दिल्या— अवघड चढाई करताना प्रशिक्षित मार्गदर्शकासोबत जाणे अनिवार्य; हेल्मेट, हार्नेस, कारबिनर व सुरक्षित दोरखंड वापरणे बंधनकारक; पावसाळ्यात ओल्या पॅचवर अतिरिक्त काळजी; तर गटातील प्रत्येकाला बेसिक बचाव तंत्रांचे प्रशिक्षण आवश्यक आहे. या थरारक बचाव मोहिमेने चंदेरी किल्ल्यावर मृत्यूच्या दरीतून परत आलेल्या एका युवकाला आयुष्याची 'दोरी' प्रत्यक्ष अनुभवायला दिली; आणि गिर्यारोहणात सुरक्षा हीच खरी शिखरापर्यंत नेणारी शक्ती असल्याची जाणीव पुन्हा एकदा त्यांनी स्पष्ट केली.

# फडणवीसांच्या चर्चेनंतर 'कृष्णा-भीमा स्थानिक विकास आघाडी

## इंदापूरमध्ये भाजपची अधिकृत घोषणा

**इंदापूर :** प्रतिनिधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा करून 'कृष्णा-भीमा स्थानिक विकास आघाडी' स्थापन करण्यात आल्याची घोषणा भाजप जिल्हाध्यक्ष शेखर वढणे आणि पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने यांनी पत्रकार परिषदेत केली. इंदापूरमध्ये भाजपतर्फे आयोजित पत्रकार परिषदेत वढणे आणि माने यांनी माहिती दिली.

याप्रसंगी पक्षनिरीक्षक माऊली चवरे, मारुतराव वणवे, शहराध्यक्ष किरण गानबोटे, मयुरसिंह पाटील, सदानंद शिरदाळे, माऊली वाघमोडे, गजानन वाकसे, शीतल साबळे आदी उपस्थित होते.

प्रवीण माने म्हणाले, "इंदापूर नगरपालिका निवडणुकीत मतांचे विभाजन होऊ नये, म्हणून भाजप कार्यकर्ते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर - या तिघांची



पत्रकार परिषदेत बोलताना शेखर वढणे व प्रवीण माने

स्थानिक आघाडी निश्चित करण्यात आली आहे." या आघाडीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि दौंडचे आमदार राहुल कुल यांच्याशी चर्चा झाली असून सर्वांनी आघाडीला हिरवा कंदील दिला आहे. "भाजप नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्यास तयार होती. आमच्याकडे नगरसेवक पदासाठी ३० तर नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवारांनी मागणी केली होती. मात्र आघाडी ठरल्यानंतर नगराध्यक्ष पदासाठी प्रदीप गारटकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे." आघाडीतर्फे २० उमेदवारांची निवड लवकरच भाजप व सहकारी नेत्यांच्या सहमतीने केली जाणार असल्याचे माने यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात

### विश्वास पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या संचालकांवर गुन्हा

**हडपसर :** विश्वास पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटचे संचालक प्रसाद कोद्रे व वडील सुभाष कोद्रे यांच्यावर निसर्ग बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या निधीचा अपहार व बनावट कागदपत्रे तयार केल्याच्या आरोपावरून क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, २०१६-२०२१ दरम्यान संस्थेच्या कारभाराचा गैरफायदा घेऊन ऑडिट रिपोर्टवर बनावट सह्या केल्या. RTI चौकशीने दिसून आले की, सुभाष कोद्रे अध्यक्ष आणि प्रसाद कोद्रे सचिव म्हणून सर्व ऑडिट रिपोर्ट सादर केले; प्रत्यक्षात तक्रारदार हेच अध्यक्ष होते. तसेच २०१७-२०२२ या काळात संस्थेच्या निधीचा रोख स्वरूपात अपहार केला, आर्थिक अहवाल तक्रारदारांना दाखवला गेला नाही, असा आरोप आहे. पोलिसांनी "वाद दिवाणी स्वरूपाचा" असे सांगून गुन्हा नोंदवण्यास नकार दिला. नंतर न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा नोंदवण्यात आला.
अभियुक्तांवर संस्थेच्या निधीचा गैरवापर करून स्वतःच्या फायद्यासाठी नवी संस्था स्थापन केल्याचा आरोप असून या प्रकरणामुळे औरंगाबाद-पुणे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

## निधन वार्ता

### शांताबाई लडकत


**पिंपरी :** भवानी पेठ येथील शांताबाई गजानन लडकत यांचे निधन झाले. त्या ९१ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या मागे तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. पुणे महानगर पालिकेचे माजी नगरसेवक व पुणे म्हाडाचे माजी संचालक संदीप लडकत यांच्या त्या मातोश्री आणि माजी नगरसेविका व पुणे शहर भाजपा महिला मोर्चा शहर अध्यक्षा मनिषा लडकत यांच्या त्या सासूबाई होत.

### लक्ष्मण सुंबे

**पुणे :** लोणी काळभोर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण दशरथ सुंबे यांचे निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते.



त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातंवडे, पुरतुंडे असा मोठा परिवार आहे. ते परिसरात आण्णा या नावाने ओळखले जायचे .पत्रकार सचिन सुंबे यांचे ते वडील होते.

# माऊलींचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात

## नामदास महाराजांच्या भावस्पर्शी कीर्तनात भक्तांच्या डोळ्यांतून अश्रूधारा



**आळंदी :** "ज्ञानदेवाचे नित्य नाम..." या संतवाणीने भारावलेले वातावरण, टाळ-मृदंगाचा निनाद, विठ्ठलनामाचा अखंड गजर आणि ज्ञानराज माऊलींच्या संजीवन समाधीवरील पुष्पवृष्टी—अशा भक्तिमय वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७२९ वा संजीवन समाधी दिन सोहळा सोमवारी (दि. १७) अलंकापुरी आळंदीत अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा झाला.

संत नामदेवरायांचे वंशज माधव नामदास महाराज यांच्या हृदयस्पर्शी कीर्तन सेवेदरम्यान अनेक भाविकांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. मंगळवारी (दि. १८) सकाळी हरिनामाच्या गजरात वैभवी छबिना पालखी सोहळ्याने कार्यक्रमाची सांगता होणार असल्याची माहिती आळंदी संस्थानचे सरपंच, प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी दिली.

**हृदयद्रावक कीर्तन; भक्त भाव**

समाधीत मंदिरातील विना मंडपात परंपरेप्रमाणे नामदास महाराजांनी माऊलींच्या जीवनचरित्रावर आधारित कीर्तन सेवा सादर केली. समाधी प्रसंगाचे वर्णन करताना महाराजांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले, तर शेकडो वारकरी-भाविकांच्या नेत्रांच्याही कडा पान्हावल्या. गाभाऱ्यात वैभवी पादुकांची पूजा, आरती, वेदमंत्रांचा घोष आणि त्यानंतर झालेली तुळशी-फुलांची मुक्त उधळण—यातून वारकरी भाविकांनी माऊलींना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

याप्रसंगी नामदास महाराज परिवार, प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, रोहिणी पवार, निलेश महाराज लोंढे, कबीरबुवा, पंढरपूर देवस्थान समिती सदस्या ॲड. माधवी निगडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, तसेच वारकरी, कीर्तनकार, मानकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहाटेपासून धार्मिक विधींची मालिका सुरू होती. पहाटे पवमान अभिषेक, दुधारती, संत नामदेवराय वंशपरंपरेनुसार महापूजा, चल पादुकांची पूजा, गाभाऱ्यातील आरती, पंचामृत अभिषेक, ब्रह्मवृंदांनी केलेला वेदमंत्रांचा जयघोष—दिवसाची भक्तिमय सुरुवात झाली. श्रीचे चांदीचे मुखवटे लावून अभिषेक करण्यात आला. हरिनाम जपात दिंडी प्रवेश, पुंडलिका वरदे हरी विठ्ठलच्या नादात प्रदक्षिणा, आणि श्रींच्या संजीवन समाधी प्रसंगावर आधारित अनेक कीर्तन सेवांनी आळंदी पंचक्रोशीत भक्तीचे झरे उडाले.

फुलांची सजावट, रोषणाई आणि स्वच्छतेने मंदिर उजळले. मंदिर परिसर विविधरंगी फुलांच्या सजावटीने नटला होता. विद्युत रोषणाईने संपूर्ण मंदिर परिसर उजळून निघाला. स्वकाम सेवा मंडळाच्या मार्गदर्शनाखाली विशेष स्वच्छता सेवा देण्यात आली.

**यात्रा व्यवस्थापनाबद्दल समाधान**

कार्तिकी यात्रा सुरळीत पार पडल्याचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडा, प्रांताधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा, आळंदी देवस्थान आणि विविध विभागांच्या समन्वयामुळे वारकरी-भाविकांना कोणतीही अडचण भासू नये याची काळजी घेण्यात आली.

# स्वयंशिस्त व कुटुंबीयांसाठी हेल्मेट वापरा : तानाजी दाते



**पिंपरी :** "स्वतःच्या कुटुंबीयांसह समाजाच्या सुरक्षेसाठी प्रत्येकाने हेल्मेट वापरणे अत्यावश्यक आहे. सिग्नलवर इंजिन बंद ठेवणे, अनावश्यक हॉर्न वाजवू नये, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये आणि वाहतूक शिस्त पाळावी," असे आवाहन सहाय्यक आरोग्य अधिकारी तानाजी दाते यांनी दै. राज्य लोकतंत्रशी बोलताना केले.

प्रभाग क्र. ९ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक-संतोषी माता चौक परिसरात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कक्षीय कार्यालय व टीम डिवाईन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेल्या या वाहतूक जनजागृती मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर हेल्मेट अवेअरनेस, सिग्नलवर इंजिन बंद ठेवण्याचे महत्त्व, सिग्नल शिस्त, अनावश्यक हॉर्नबंदी, सार्वजनिक ठिकाणी न थुंकणे याबाबत वाहनचालकांना प्रत्यक्ष संवादातून मार्गदर्शन करण्यात आले. सिग्नलवर थांबलेल्या नागरिकांना "तुमची सुरक्षितता तुमच्या हातात" असा संदेश दिला गेला. या मोहिमेस ह्युमन मॅट्रिक्सचे आश्विन गोहोत्रे, मुख्य आरोग्य निरीक्षक सतिश इंगेवाड, वैभव घोळवे, आरोग्य निरीक्षक राहुल जेटिथोर, तसेच डिवाईन वेस्ट मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेसचे प्रोजेक्ट मॅनेजर आकाश परदेशी उपस्थित होते. मोहीम यशस्वीतेने पार पाडण्यासाठी टीम डिवाईनचे गणेश भिसे, निखिल भोसले, रोशन खळगे, सनी काळे, राजवर्धन नाथभजन, दिलीप पाडाळे, आकाश काटे यांसह अनेक स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. वाहतूक शिस्तीचे पालन हे शहराच्या सुरक्षेसाठी अत्यावश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबतची जाणीव अधिक पक्की होते, असेही त्यांनी सांगितले.

# परवानगीशिवाय 'सेवा विकास' बँक बंद

## २०५ कामगार कपात प्रकरणात लिक्विडेटर घेरावात

**;पिंपरी-चिंचवड :** सेवा विकास को-ऑपरेटिव्ह बँकेने शासनाची वा कामगार विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता थेट बँक बंद करून तब्बल २०५ कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष आणि कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी या बेकायदेशीर निर्णयाविरोधात पुढाकार घेतल्याने प्रकरणात मोठी कलाटणी झाली असून सहाय्यक कामगार आयुक्तांनी लिक्विडेटरला सर्व कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावर घेण्याचे आदेश दिले आहेत.

मागील तीन वर्षांपासून बँकेचे नियमित कामकाज पूर्णपणे बंद आहे आणि फक्त कर्जवसुलीची कामे सुरू असल्याचे समोर आले. नोव्हेंबर २०२२ मध्ये कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना, कारणमीमांसा वा शासनाची मान्यता न घेता सेवा समाप्तीची पत्रे देण्यात आली. बँक का बंद करण्यात आली, कामगार कपातीची गरज कशी निर्माण झाली याबद्दलही कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. या निर्णयामुळे २०५ कुटुंबांवर दोन वर्षांहून अधिक काळ आर्थिक संकट कोसळले असून अनेक कर्मचारी उपजीविकेअभावी गंभीर अडचणीत सापडले आहेत. या ताणातून दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला—एकाने गळफास घेऊन आत्महत्या केली तर दुसऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, लिक्विडेटरकडून "बँक सुरू होईल, देणी दिली जातील, पण तक्रार करू नका" असा दबाव आणला जात होता. तक्रार केली तर नुकसान होईल, अशी भीती दाखवण्यात आल्याने अनेक कर्मचारी कामगार कार्यालयात जाण्यास घाबरत होते. शेवटी काही कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय श्रमिक आघाडीत सामील होत संघटनेला अधिकृतरित्या तक्रार करण्याचा अधिकार दिला. त्यानंतर संघटनेने कामगार कार्यालय, औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर प्रक्रिया राबवण्याची तयारी दर्शवली. सहाय्यक कामगार आयुक्तांनी प्राथमिक चौकशीत बँक बेकायदेशीर पद्धतीने बंद केल्याचे स्पष्ट केले असून शासनाची परवानगी नसताना मोठ्या प्रमाणावर झालेली कामगार कपात ही गंभीर कायदेशीर चूक असल्याचे नमूद केले. परिणामी लिक्विडेटरला सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कर्मचारी आता रुजू होण्यासाठी बँकेत हजर होत असल्याने लिक्विडेटरच्या हालचालींना अचानक वेग आला आहे. कामगार कार्यालयाकडून लिक्विडेटरविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली असून आता लिक्विडेटर कोणती भूमिका घेतात याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. २०५ कामगारांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नाशी निगडित असलेल्या या प्रकरणाने पिंपरी-चिंचवडमध्ये मोठी खळबळ उडाली असून या घडामोडींमुळे बँकेच्या प्रशासनाची कार्यपद्धती, निर्णय प्रक्रिया आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### सिंहगड कॉलेजजवळ २२ वर्षीय तरुणाची हत्या

**पुणे :** शहरातील गुन्हेगारी परिस्थिती चिंता वाढवणारी ठरली आहे. सिंहगड कॉलेजजवळ एका २० ते २२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला असून, त्याचे डोके दगडाने ठेचून कोयत्याने वार केलेले आहेत. पोलिसांचा अंदाज, ही हत्या रात्री उशिरा किंवा पहाटेपूर्वी घडली असावी. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर सिंहगड रोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून हत्येचा प्राथमिक तपास सुरू केला असून, घटनास्थळावरून दिसणाऱ्या हत्येच्या पॅटर्नवरून ही घटना पूर्वनियोजित कट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सध्या मृतकाची ओळख पटवण्याचे काम सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिस खुनीच्या शोधात आहेत. या घटनेमुळे परिसरात भयाचं वातावरण पसरलं असून नागरिकांमध्ये चिंतेची लाट आहे. पुण्यातील ही निर्घृण घटना शहरातील गुन्हेगारीची गंभीर स्थिती पुन्हा एकदा उजागर करते आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण करते.

# पर्यटकांचे आकर्षण ठरलेला इतिहासप्रसिद्ध 'किल्ले राजगड'



**राजगड (रुपाली नलावडे) :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची पहिली राजधानी म्हणून ओळख असलेला किल्ले राजगड हा शिवकालीन दुर्गरचनेचा उत्तुंग नमुना असून निसर्गरम्य परिसर, मजबूत डोंगरी किल्लाबंदी आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.

समुद्रसपाटीपासून सुमारे ६०० मीटर उंचावलेला हा किल्ला पाली दरवाजा आणि गुंजवणे दरवाजा या दोन मार्गांनी सर करता येतो. पाली मार्ग तुलनेने सोपा, तर गुंजवणे मार्ग चढाईस अवघड असल्याने येथे सुरक्षेसाठी स्टील रेलिंग बसवण्यात आले आहेत

राजगडच्या पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी या तीन माच्या आणि भक्कम बालेकिल्ल्यामुळे त्याची दुर्गवैभवशाली रचना अधिक उठून दिसते. पद्मावती माचीवरील वस्तीचे अवशेष, देवीचे मंदिर, दारुखाना, दिवाणखाना, पागा, राजवाड्याचे अवशेष तसेच गडावरील न आटणारी जलतळी आजही इतिहासाची साक्ष देत उभी आहेत.

सन १६७० पर्यंत स्वराज्याची राजधानी असलेला हा किल्ला शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या काळात महत्त्वाची लष्करी भूमिका बजावत होता. काहीकाळ औरंगजेबाच्या ताब्यात गेल्यानंतरही तो मुख्यत्वे मराठ्यांच्याच अखत्यारीत राहिला. 'मुरुमदेव' या नावानेही राजगड ओळखला जात असे. पावसाळ्यात धुक्याचा वेढा, जंगलराई, धबधबे आणि दऱ्याखोऱ्यांचे दर्शन पर्यटकांना गडाच्या प्रेमात पाडतात. किल्ल्याकडे जाणाऱ्या वाटांवर स्थानिकांकडून ताक, लिंबूपाणी व अल्पोपहारदेखील उपलब्ध होतो.

पर्यटनवाढ लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने गडावरील संवर्धन आणि दुरुस्तीची विविध कामे सुरू केली आहेत. पद्मावती माचीवरील काही ढासळलेली बांधकामे पुनर्बांधणीच्या टप्प्यात असून परिसरात अधूनमधून प्राचीन वस्तूंचे अवशेषही आढळून येत आहेत.

# पुण्यात पुतळा हटवल्याने शिवप्रेमींचा तीव्र निषेध

## मामलेदार कचेरीत ठिय्या आंदोलन सुरू



**पुणे:** शहरातील मामलेदार कचेरी येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा प्रशासनाच्या आदेशावर हटवल्याने विविध शिवप्रेमी संघटनांकडून ठिय्या आंदोलन सुरू झाले आहे. राज्य सरकार आणि प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत असून वातावरण तणावपूर्ण आहे.

ठाकरे गटाचे पुणे शहर प्रमुख संजय मोरे म्हणाले, "मामलेदार कचेरी ही ऐतिहासिक वास्तू आहे. अशा वास्तूमध्ये कोणतेही बांधकाम किंवा डागडुजी करण्यासाठी सर्व आवश्यक परवानग्या घेणे अनिवार्य आहे. मात्र, सद्यस्थितीत अधिकारी वर्गाने कोणतीही परवानगी न घेता छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटवण्याचे काम केले आहे. ही आम्हाला खूपच खेदाची बाब वाटते."

मोरे यांनी स्पष्ट केले की, "या घटनेचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुन्हा याच ठिकाणी बसवला जावा. जोपर्यंत तो बसवला जात नाही, तोपर्यंत आम्ही येथून हटणार नाही, अशी आमची भूमिका आहे."

पुतळा हटवल्याच्या घटनेमुळे शिवप्रेमी संघटनांचे आंदोलक मामलेदार कचेरीमध्ये एकत्रित झाले असून प्रशासनावर दबाव वाढत आहे. पुणे शहरातील ऐतिहासिक ठिकाणी या प्रकारच्या कारवाया सामाजिक आणि राजकीय वाद वाढवू शकतात, अशी तणावाची लाट आहे.

# कोथरूडमध्ये मेट्रोच्या परिसरात 'पादचारी कोंडी'

## अहवालात गंभीर निष्कर्ष : तुटके पदपथ, अतिक्रमण, असुरक्षित वाटा

**पुणे :** वनाझ ते रामवाडी या पुणे मेट्रो मार्गिकेवरील कोथरूड परिसरात पादचाऱ्यांच्या सुरक्षेची स्थिती अत्यंत बिकट असल्याचे नुकत्याच झालेल्या 'पादचारी अनुकूलता मूल्यांकन' अहवालातून स्पष्ट झाले आहे. वनाझ, आनंदनगर, आयडियल कॉलनी, नळ स्टॉप आणि गरवारे कॉलेज या पाच प्रमुख स्थानकांभोवती तब्बल चार किलोमीटरपर्यंतचे पदपथ तुटलेले, अतिक्रमणाने व्यापलेले आणि अनेक ठिकाणी पूर्णतः असुरक्षित असल्याचे निष्कर्ष यातून समोर आले आहेत.

महाराष्ट्र मेट्रो, पुणे नॉलेज क्लस्टर, पर्यावरण व शाश्वत विकास संस्था तसेच 'सेव्ह पुणे ट्रॅफिक मूव्हमेंट' यांनी संयुक्तरीत्या राबवलेल्या 'चालत, बस-सायकल अन् मेट्रो' मोहिमेअंतर्गत हा अभ्यास करण्यात आला. या अहवालात मेट्रो प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना स्थानकांपर्यंत पोहोचताना येणारे अडथळे स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आले आहेत. अहवालानुसार खाद्य विक्रेत्यांचे अतिक्रमण, उखडलेल्या फरश्या, झाडांच्या मुळांमुळे उंचावलेले पदपथ, कचऱ्याचे ढीग, तसेच अनेक ठिकाणी उघडी चेंबर झाकणे—यामुळे पादचाऱ्यांना अडथळे ओलांडत चालावे लागत असून रात्रकाळी अपुरा उजेड असल्याने धोका अधिक वाढत आहे.

कोथरूडमधील शिक्षक नगर-योगानंद पार्क ते रामचंद्र माने रस्ता हा वनाझ मेट्रो स्थानकाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग असून शाळा, दुकाने, बसथांबे असतानाही या रस्त्यावर तुटलेल्या फरश्यांमुळे आणि वाढत्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांची पायपीट धोकादायक ठरत आहे. अहवालात नानासाहेब धर्माधिकारी रस्ता, नानासाहेब सुतार रस्ता, स्वामी विवेकानंद रस्ता आणि श्रीपती सुथार रस्ता हे चार मार्ग 'हाय रिस्क' झोन म्हणून स्पष्टपणे चिन्हांकित करण्यात आले आहेत. या रस्त्यावरील प्रचंड वाहतूक, पदपथाचा अभाव आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचणे अक्षरशः संघर्षाचे झाले आहे.

पुणे नॉलेज क्लस्टरच्या वरिष्ठ सल्लागार अंकिता काणे म्हणाल्या की, पादचारी सुविधांची ही दयनीय अवस्था लक्षात घेता तीन हजारांहून अधिक नागरिकांनी महापालिकेला पादचारी अनुकूल उपाययोजना तातडीने राबवण्याची मागणी पत्राद्वारे केली असल्याचे त्यांनी सांगितले.

# भरधाव कंटेनरच्या धडकेत तरूणाचा जागीच मृत्यू

**पिंपरी-चिंचवड :** हिंजवडी परिसरात अवजड वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर झाला आहे. २० वर्षीय फॅशन डिझायनर तन्वी साखर यांचा भरधाव डंपरच्या चकाकी धडकेत जागीच मृत्यू झाला. ही घटना वडिलांच्या समोर घडल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे

दुपारी १ ते १:३० च्या सुमारास, तन्वी त्यांच्या वडिलांसोबत पुनावळे-कोलते पाटील रस्त्याने हिंजवडीत जात होत्या. अचानक एका भरधाव डंपरने दुचाकीला पाठीमागून धडक दिली, ज्यामुळे वडील बाजूला पडले, तर तन्वी थेट डंपरच्या चाकाखाली आल्या. घटनेत तन्वीचा जागीच मृत्यू झाला. हिंजवडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील तपास सुरू आहे. ही घटना लक्षात घेतल्यास, गेल्या महिन्यात भारती मिश्रा या महिलेचा भरधाव सिमेंट मिक्सरने धडक दिल्यामुळे जागीच मृत्यू झाल्याची आठवण येते. गेल्या काही महिन्यांपासून अवजड वाहतुकीच्या असंवेदनशीलतेमुळे महिला नागरिकांचा जीव धोक्यात आहे. रहिवाशांचे आवाहन आहे की प्रशासन या प्रकरणावर तातडीने कडक नियंत्रण आणावे, अन्यथा हिंजवडीतील या प्रकारची दुर्घटना सतत घडत राहणार आहे. हिंजवडी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पुण्यात भाजपच्या 'मिशन १२५'ला धंगेकरांचे आव्हान

## शिवसेना (एकनाथ शिंदे) ची स्वबळावरची तयारी



**पुणे :** जैन बोर्डिंग प्रकरणावरून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर टीका करून महायुतीत खळबळ उडविल्यानंतर शांततेची भूमिका घेणारे शिवसेना (शिंदे) पक्षाचे महानगरप्रमुख व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी आता पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा भाजपला सरळ आव्हान दिले आहे.

भाजपने नगरपालिकेसाठी जाहीर केलेल्या 'मिशन १२५' योजनेला धंगेकर अडथळा ठरू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मोहोळ प्रकरणातील वाद वाढल्यानंतर भाजपने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार नेल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धंगेकरांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला होता. हे प्रकरण थंडावल्यानंतर आता धंगेकरांनी महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना (शिंदे) पक्ष स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केल्याचे स्पष्ट केले. महापालिकेच्या सर्व १६५ प्रभागांत उमेदवार उभे करण्यासाठी नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मागिल २०१७ च्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेचे १० नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतर अविनाश साळवे काँग्रेसमध्ये गेले, तर विशाल धनवडे, बाळा ओसवाल, प्राची अल्हाट, पल्लवी जावळे आणि संगिता ठोसर हे भाजपमध्ये दाखल झाले. पृथ्वीराज सुतार, संजय भोसले आणि श्वेता चव्हाण हे ठाकरे गटात गेले. त्यामुळे सध्या शिवसेना (शिंदे) गटाकडे शहरात केवळ एकच नगरसेवक – प्रमोद उर्फ नाना भानगिरे – उरला आहे. मात्र, धंगेकरांना महानगरप्रमुखपद मिळाल्यानंतर त्यांच्या व्यापक जनसंपर्कामुळे अनेक कार्यकर्ते पक्षात येण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

धंगेकर हे शिवसेना, मनसे आणि काँग्रेस या तीन पक्षांत काम केल्याने त्यांची शहरातील पकड अधिक विस्तारली आहे. त्यांनी सर्व प्रभागांमध्ये उमेदवारांची चाचपणी सुरू केली असून तरुण व सुशिक्षितांना प्राधान्य देण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे महापालिका निवडणुकीत ते भाजपपुढे कोणते आव्हान उभे करतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे, भाजपकडूनही उमेदवार निश्चितीचे काम सुरू असून निवडणूक महायुतीतून लढवायची की स्वतंत्रपणे, याबाबतचा अंतिम निर्णय उपमुख्यमंत्री शिंदे घेणार आहेत. मात्र, शिवसेना (शिंदे) गटाने स्वबळावरची तयारी सुरू केल्याने पुण्यातील निवडणूकत्रिकोण अधिकच रंगणार आहे, असे संकेत मिळत आहेत.

# कांदा रोपांचे भाव गगनाला



**बनकरफाटा :** आणे-माळशेज पट्टा (ता. जुन्नर) 'फुरसुंगी कांद्याचे आगार' म्हणून ओळखला जातो. येथून तयार होणारे कांदा बियाणे मराठवाडा, विदर्भात पाठवले जाते आणि राज्यभरातील शेतकऱ्यांना त्याची विक्री होते. मात्र यंदा बाजारभाव कोसळणे, अतिवृष्टी आणि खर्चाचा बोजा वाढल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे.

ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये झालेल्या मुसळधार पावसाने प्रथम टाकलेली कांद्याची रोपे सडली. आगात केलेली लागवड पूर्णतः निकामी झाली. आणे परिसरातील सुमारे २०० एकरांमधील कांदा पिकात शेळ्या-मेंढ्या घालण्याची वेळ आली. त्यानंतर शेतकऱ्यांनी प्रति किलो २५०० रुपयांच्या बियाण्याची दुबार पेरणी केली आहे. पहिल्या पीकपाठोपाठ बाजारभाव कोसळल्याने शेतकरी अधिकच अडचणीत आला आहे. गेल्या वर्षभरात अतिवृष्टीमुळे अनेकांचे पिके वाहून गेली; तर साठवलेल्या जुना कांद्याला कवडीमोल भाव मिळाला. खर्च केलेले भांडवलही परत न मिळाल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोसळला. यावर्षीच्या कांद्यासाठी केलेली पेरणी अवकाळी पावसाने कुजून गेल्याची ओरड सर्वत्र ऐकू येत आहे. माळशेज परिसरात अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर रोपे नष्ट झाली. गेल्या आठवडाभरात कांदा रोपांची मागणी प्रचंड वाढली असून "रोप मिळेल का?" अशी विचारणा शेतकरी एकमेकांकडे करताना दिसत आहेत. रोपांचे दर प्रचंड वाढले असून, सध्या शेतकऱ्यांना प्रति एकर २५ ते ३५ हजार रुपये खर्च करूनच लागवड करता येत आहे. त्यामुळे एकूण खर्च विक्रमी पातळीवर पोहोचला आहे.

शेतकऱ्यांनी सांगितले की, ५ ते १२ रुपये कांद्याला मिळत आहे. मात्र, खर्च मात्र गगनाला भिडले आहेत. कांद्याला सध्या बाजारात केवळ ५ ते १२ रुपये किलो दर मिळत असल्याने उत्पादनाचा खर्चही वसूल होत नाही. "भाव कोसळले... केलेले भांडवलही परत येत नाही. त्यामुळे शेती करावी की नाही, असा प्रश्न आजच्या तरुण शेतकऱ्यांना पडला असल्याची तक्रार कांदा उत्पादकांनी केली.